06 APR 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या पूर्वसंध्येला सोमवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. (छाया : नसीर अत्तार)

# विद्यापीठाचा आज ऑनलाईन दीक्षांत

## 'शिववार्ता'वर प्रक्षेपण : कोश्यारी, सहस्त्रबुद्धे, उदय सामंत करणार मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ आज, मंगळवारी सकाळी पावणेअकरा वाजता कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी, प्रमुख पाहुणे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत हे मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातून 'शिववार्ता' या युट्युब चॅनेलवरून या समारंभाचे थेट प्रक्षेपण होणार आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा पद्धतीने दीक्षांत समारंभ होणार आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने राज्यातील अन्य विद्यापीठांप्रमाणे शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन दीक्षांत समारंभ आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगळवारी हा समारंभ होणार आहे. सकाळी पावणेअकरा वाजता त्याची सुरुवात होईल.

कुलगुरू कार्यालयापासून राजर्षी शाहू सभागृहापर्यंत मिरवणूक काढण्यात येईल. त्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे आणि चार अधिष्ठाता असतील. त्यानंतर मुख्य समारंभ होईल. त्यामध्ये यावर्षीच्या राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता विद्यार्थी सौरभ पाटील आणि कुलपती पदक विजेती विद्यार्थिनी महेश्वरी गोळे यांच्यासह चार विद्याशाखांमधील प्रत्येकी एका पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांची नावे घोषित केली जातील.

त्यांच्यासह सर्व ७७,५४२ स्नातकांना पोस्टाच्या माध्यमातून पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहेत, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक पळसे यांनी दिली.

### पाच वर्षांपूर्वी 'वेब कास्टिंग'चे पाऊल

ज्या विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांना दीक्षांतसाठी विद्यापीठात उपस्थित राहता येऊ शकत नाही, त्यांच्यासाठी विद्यापीठाने आपल्या संकेतस्थळावरुन २०१५ मध्ये या समारंभाचे वेब कास्टिंग करण्याचे पाऊल टाकले. ते दरवर्षी केले जाते.

0 6 APR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षान्त समारंभाच्या पूर्वसंध्येला सोमवारी मुख्य इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई.
(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

06 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# ऑनलाईन दीक्षांत समारंभ...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ आज (दि. ६) ऑनलाईन पद्धतीने सकाळी ११ वाजता होणार आहे. यानिमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस आकर्षक विद्यूत रोषणाई केली आहे. समारंभास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी अध्यक्षस्थान भूषवणार असून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहेत. ५० लोकांच्या उपस्थितीत विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. पदार्थविज्ञान विभागातील व्दितीय वर्षाचा विद्यार्थी सौरभ पाटीलला राष्ट्रपती सुवर्णपदक व सातारच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी गोळे हिला कुलपती मेडलने सन्मानित करण्यात येईल. https://www.youtube.com/c/shivVarta या लिंकद्वारे ऑनलाईन सोहळ्यात सहभागी होता येणार आहे. (छाया : रियाज ट्रेनर)

पुण्य नगरी
SMART कोल्हापूर
मंगळवार, ६ एप्रिल २०२१



**शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ मंगळवार, दि. ६ एप्रिल रोजी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या विद्युत रोषणाईने विद्यापीठाची वास्तू सप्तरंगात अशी न्हाऊन निघाली. (छाया : पांडुरंग पाटील)



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी विद्यापीठाचा आज ऑनलाईन दीक्षांत समारंभ

## 'शिव-वार्ता' यूट्यूब चॅनेलवरून समारंभाचे थेट प्रसारण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवारी (दि. ६) राजर्षी शाहू सिनेट सभागृहात सकाळी १०.४५ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत विशेष अतिथी असतील. यंदा पहिल्यांदाच विद्यापीठ इतिहासात ७७ हजार ५४२ पदवी प्रमाणपत्र वितरित केली जाणार आहेत.

विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब चॅनेलवरून दीक्षांत समारंभाचे थेट प्रसारण करण्यात येणार आहे. समारंभात विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी सौरभ संजय पाटील यास राष्ट्रपती सुवर्णपदक व सातान्याच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी धनंजय गोळे हिला कुलपती सुवर्णपदक ऑनलाईन पद्धतीने प्रदान करण्यात येणार आहे.

यावर्षी पदवी प्रमाणपत्र घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७७,५४२ आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा - ३५,५९७, वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखा - २१,९२७, मानव्यविद्या शाखा - १७,८८३ व आंतरविद्या शाखा - २,१३५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पीएच.डी. - १७४, एम.फिल. - ३६, पदव्युत्तर पदवी - १०,३४२, पदवी - ६६,३७३, डिप्लोमा - ५५३, सर्टिफिकेट - ६४ विद्यार्थी आहेत. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह विविध शाखांचे अधिष्ठाता यांची उपस्थिती असणार आहे.

0 6 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची कामगिरी अभिमानास्पद

## डॉ. संजय पाटील यांचे गौरवोद्‌गार : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे केले अभिनंदन

वार्ताहर
कसबा बावडा

शिवाजी विद्यापीठाने आपल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळवले आहे. अभ्यासक्रम, शिक्षण, संशोधन, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रात विद्यापीठाने गरुडझेप घेतली असून, ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे गौरवोद्‌गार डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती व शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी काढले. डॉ. संजय पाटील व आमदार ऋतुराज पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची नुकतीच भेट घेतली. यावेळी विद्यापीठाने 'नॅक' मानांकनात घेतलेल्या गरुडभरारीबद्दल कुलगुरूंचे अभिनंदन करण्यात आले. विद्यापीठाची भविष्यकालीन योजना, प्रगती यावर सविस्तर चर्चा झाली.



**कोल्हापूर: कुलगुरू डॉ. शिर्के यांचे अभिनंदन करताना डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय पाटील. सोबत आमदार ऋतुराज पाटील व इतर.**

शिवाजी विद्यापिठाने 'नॅक'चे सर्वोच्च मानांकन मिळवून शिक्षण क्षेत्रात नाव बेंचमार्क निर्माण केला आहे. विद्यापीठाशी सबंधित सर्वच घटकांनी घेतलेल्या परिश्रमांची ही पोहचपावती आहे. भविष्यात प्रगतीच्या सर्वच क्षेत्रात विद्यापीठाचा झेंडा डौलाने फडकताना दिसेल, असा विश्वास यावेळी डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या भविष्यकालीन विस्तार व अन्य बाबीसाठी शासन पातळीवरून आवश्यक असलेला निधी व अन्य मदतीसाठी आपला नेहमीच पुढाकार राहील, अशी ग्वाही आमदार ऋतुराज पाटील यांनी यावेळी दिली. आमदार पाटील यांनी सर्व सहकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे अभिनंदन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नंदिवडेकर, डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव उपस्थित होते.

0 6 APR 2021
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवार, दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी होत आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे या वर्षी ऑनलाईन स्वरूपात दीक्षांत समारंभ होणार आहे. नोंदणी केलेल्या ७७ हजार ५४३ विद्यार्थ्यांना पोस्टाच्या माध्यमातून पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ आणि दीक्षांत विभागाकडून ऑनलाईन समारंभ आणि प्रमाणपत्र वितरित करण्याची तयारी पूर्ण झाली आहे; मात्र कोरोनामुळे प्रतिवर्षी असणाऱ्या दीक्षांत समारंभाच्या उत्साहावर विरजण पडले आहे.

या वर्षी पदवी प्रमाणपत्रासाठी शिवाजी विद्यापीठाकडे ७७ हजार ५४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्या परिषद आणि व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळांच्या निर्णय आणि मान्यतेनुसार या विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे पदवी घरपोच पाठवण्यात येणार आहे. त्यासाठी शिव दीक्षांत प्रणालीच्या माध्यमातून काम सुरू आहे. विद्यापीठाच्या ऑनलाईन दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या शिववार्ता या यूट्यूब चॅनेलवरून त्याचे प्रसारण करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 APR 2021

लोकमत

# ३२ हजार ऑनलाईन परीक्षार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सध्या सुरू आहेत. त्यामध्ये सोमवारी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ३३४८९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात ३२५६० ऑनलाईन परीक्षार्थी होते. या सत्रातील परीक्षा दि. २२ मार्चपासून सुरू झाल्या आहेत. ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येत आहेत. त्यात एम. लिब., एमएसडब्ल्यू., एम. कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्यूएशन, एमसीए., एम. एस्सी. , बी. एस्सी, आदी विविध २९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आल्या.

# शिवाजी विद्यापीठाचा आज ऑनलाईन दीक्षान्त समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षान्त समारंभ आज होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात मर्यादित संख्येत सोहळा होणार आहे. समारंभाचे अध्यक्ष कुलपती भगतसिंग कोश्यारी, प्रमुख पाहुणे ए.आय.सी.टीचे अध्यक्ष अनिल सहस्त्रबुद्धे, मंत्री उदय सामंत हे देखील ऑनलाईन पद्धतीने सोहळ्यात सहभागी होतील. प्रातिनिधीक स्वरूपात काही पदवी प्रमाणपत्रांचे वाटप होईल. उर्वरित पदवी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना पोस्टाने पाठवली जाणार आहेत. एकूण ७७,५४२ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कोविडच्या पार्श्वभूमीवर सर्वच कार्यक्रम रद्द केले आहेत. विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ मात्र ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. यासाठी कोरोनाप्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करून समारंभाचे नियोजन केले आहे. सभागृहात एक आड एक या पद्धतीने सर्वांना बसवण्यात येईल. मान्यवर ऑनलाईन पद्धतीने या समारंभात सहभागी होतील. प्रत्येक विद्याशाखेच्या एक अशा पद्धतीने मोजक्याच स्नातकांना बोलवले आहे. त्यांना प्रातिनिधीक स्वरुपात पदवी प्रदान करण्यात येईल. त्यानंतर मान्यवर मार्गदर्शन करतील. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच दीक्षांत समारंभ ऑनलाईन होणार आहे.

Kolhapur, Main
06/04/2021 Page No. 5

# ३२ हजार विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या २६ अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा आज ऑनलाईन पद्धतीने झाल्या. या अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ३३,४८९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यातील ३२,५६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. आज बी.कॉम. आय.टी, बी.कॉम., बी.एस.सी (फॉरेन्सिक, फूड प्रोसेसिंग), बी.बी.ए, बी.सी.ए, बी.एस.डब्ल्यू, बी.आय.डी, बी.व्होक, एम.ए., बी.एस.सी कॉम्प्युटर, एम.लीब, एम.एस.डब्ल्यु, एम.सी.ए, एम.एस.सी यांसह अन्य परीक्षा झाली. परीक्षेमध्ये आलेले तांत्रिक अडथळे विद्यापीठ परीक्षा विभाग आणि सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनी यांनी दूर केल्या. यातूनही तांत्रिक अडचणींमुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही त्यांच्या अडचणीची सोडवणूक केली जाईल, अशी माहिती परीक्षा नियंत्रक गजानन पळसे यांनी दिली आहे.